राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१
फोन नं.(०२०) २६०५०६४१

ई-मेलआयडी:-comscea.pune@maharashtra.gov.in secscea.pune@maharashtra.gov.in

जा.क्र.रासनिप्रा/ कक्ष१६/जमाआआ/सन २०१५ दि.२५ / ०२/२०१५

वाचावे:-१) केंद्रिय माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील नियम ५ (१)
२) आदेश क्रं.रासनिप्रा/माहिती अधिकारी नेमणूका/१४/१०८७ दिनांक १८/१२/२०१४
३) परिपत्रक क्र.रासनिप्रा/कामकाज वाटप/२०१४,दि.३१/१२/२०१४
४) आदेश क्र. जा.क्र.रासनिप्रा/ कक्ष१६/जमाआआ/सन २०१५,दि. १८/ ०२/२०१५

**विषय :- राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य,पुणे या कार्यालयातील सहाय्यक प्रशासकीय अधिकारी यांना सहाय्यक जन माहिती अधिकारी म्हणून घोषित करणेबाबत.....**

## परिपत्रक

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, या प्राधिकरणाचे परिपत्रक क्र.रासनिप्रा/कामकाज वाटप/२०१४,दि.३१/१२/२०१४ अन्वये एकुण १६ कक्ष प्रमुख यांचेकडे कामकाजाबाबतचे विभाग निहाय वाटप केले असून,उक्त वाटपाअंतर्गत संबंधित कक्षप्रमुखांनी आपल्या कक्षाशी संबंधित माहिती अधिकार अर्जावर कार्यवाही करणेबाबत नमुद केले आहे.यापूर्वी या प्राधिकरणाचे आदेश क्रं.रासनिप्रा/माहिती अधिकारी नेमणूका/१४/१०८७ दिनांक १८/१२/२०१४ अन्वये माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राधिकरणाकडील प्राप्त अर्जावर कार्यवाही करण्यासाठी श्री.जे.पी.शिंदे, प्रशासकीय अधिकारी यांना जनमाहिती अधिकारी व श्री. श्रीकृष्ण वाडेकर ,सहाय्यक सहकारी निवडणूक अधिकारी यांना प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून यापूर्वी घोषित करण्यात आले आहे.

त्यानंतर संबंधित कक्ष प्रमुखांना माहितीचा अधिनियम २००५ मधील नियम क्र.५ (१) नुसार पद निर्देशित करणे आवश्यक असल्यामुळे या प्राधिकरणाचे आदेश क्र. जा.क्र.रासनिप्रा/ कक्ष१६/जमाआआ/सन २०१५,दि. १८/ ०२/२०१५ नुसार सहाय्यक जनमाहिती अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. संबंधित सहाय्यक जन माहिती अधिकारी यांचेकडे अधिकाराचा अर्ज प्राप्त झाल्याबरोबर अर्जदाराने मागणी केलेली माहितीची छाननी करुन आवश्यक मागणी केलेल्या कागदपत्रांसाठी प्रती पृष्ठ रु.२/- प्रमाणे परिगणना करुन खर्चाची व पोस्टाच्या खर्चाची रक्कम अर्जदारास पुढील लेखाशिर्षाखाली प्राधिकरणाकडील लेखाकक्षाकडे रोख भरणा करण्याबद्दल सुरवातीलाच कळविणे अपेक्षित आहे.

**माहिती अधिकार अर्जा अंतर्गत जमा करावयाच्या रोख रकमेचे लेखाशिर्ष**

" ००७
इतर प्रशासनिक सेवा
६०-इतर सेवा
८००-इतर जमा रक्कम
(१८) माहिती अधिकार
अध्यादेश (००७०-१६-१) "

Scanned with CamScanner

वरिल पत्राची प्रत लेखाकक्षाकडे पृष्ठांकित करण्यात यावी. अर्जदाराने माहितीच्या प्रतींबाबत खर्चाचा भरणा करुन सहाय्यक जनमाहिती अधिकारी तथा कक्ष प्रमुख यांचेकडे पावती सादर केल्यानंतरच माहितीच्या छायांकित प्रती काढण्याची प्रक्रिया सुरु करावी. खर्चाचे पत्र दिल्या तारखेपासून खर्चाचा भरणा करणेपर्यंतचा कालावधी वगळुन मिळतो. अर्जदाराने व्यक्तिश: माहिती घेणार आहे असे अर्जात नमुद केले असल्यास व्यक्तिश: माहिती घेण्यास ३० दिवसांत अर्जदार यांनी येणे आवश्यक आहे.

अर्जात त्रयस्थ व्यक्तीची माहिती मागितली असल्यास त्या व्यक्तिला कलम ११ प्रमाणे माहिती द्यावी किंवा कसे याबद्दल विचारावे. त्याची प्रतही अर्जदारास पाठवावी.

अर्जदारास माहिती पुरविण्याचा निर्णय देताना माहितीने समाधान न झाल्यास प्रथम अपिलीय अधिका-याकडे ३० दिवसांत प्रथम अपिल करावे असे माहिती अधिका-याचे सहीने स्पष्ट कळवावे. प्रथम अपिलीय अधिका-याचा पुर्ण तपशील द्यावा. प्रथम अपिलीय अधिका-याकडे अपिल दाखल केल्यावर ते प्रथम अपिल ३० दिवसांत किंवा विशिष्ठ परिस्थितीत ४५ दिवसांत निकाली काढणे आवश्यक आहे.

(डॉ.आनंद जोगदंड)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रति,**

१. सर्व संबंधित कक्ष प्रमुख तथा सहाय्यक जनमाहिती अधिकारी
२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी
३. अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक सहकारी निवडणूक अधिकारी

Scanned with CamScanner